# परिपत्रक क्रमांक २८९ दिनांक ३१/५/१९९६

पहा :- महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडील निर्णय क्रमांक १०४३१/ई
दिनांक ४/५/१९५३.

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३३(२) अन्वये मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० चे नियम १७(२) दोन मध्ये विहीत केलेल्या प्रमाणे ज्या न्यासाचे वार्षिक एकूण उत्पन्न (ग्रॉस इन्कम) रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) व त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या न्यासाचे हिशेब तपासून परिखित लेखा पत्रके सादर करणेविषयी अधिकृत लेखा पिरक्षकांची नेमणूक करण्यांत येते. या संदर्भात महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचे शासन निधी क्रमांक १०४३१/ई दिनांक ४/५/१९५३ मधील निकषानुसार पात्र उमेदवाराची नियुक्ती करणेत येते. अन्य नियुक्ती प्रमाणे पात्र उमेदवारास प्रत्यक्ष लेखा परिक्षणाचा अनुभव असणे ही महत्वाची व धोरणात्मक बाब आहे. म्हणून या परिपत्रकाव्दारे असे प्रस्तूत करणेत येते की, उक्त दिनांक ४/५/१९५३ चे शासन निर्णयातील निकषात काही बसले तरी उपरोल्लिखित १९५० चे कलम ३३ (२) अन्वये नेमण्यात येणाऱ्या अधिकृत लेखा परिक्षकांचा मान्यतेप्रकरणी उमेदवारां/अर्जदारां विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त करुन घेतल्याच्या दिनांकापासून पुढील ५ वर्षाचा मान्यवर सनदी लेखापालाकडील प्रत्यक्ष लेखा परिक्षणाचा अनुभव असणे ही अट प्रमुख व सक्तीची राहील.

(नि.तु.पुरंदरे),
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

मुंबई
दिनांक

प्रत :- कार्यालयीन आदेश धारीणी